सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

Tele : ०२५३-२९९३२५०

E mail :sanchalakspi@gmail.com
Web Site :www.girlspinashik.com

मुलींची सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था
शासकीय दुध डेअरी समोर,
पत्रकार कॉलनी, त्रिबंक रोड,
नाशिक-४२२००२

**करार पद्धतीने विवक्षित कामासाठी नेमणुक करण्यात येणाऱ्या सहायक अधीक्षक पदाच्या कर्तव्याचे स्वरूप व इतर अटी व शर्ति**

अ. **कर्तव्याचे/जबाबदारीचे स्वरूप :-**

i. संस्थेत प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थीनींचे रोजच्या रोज तयार होणारे परेड स्टेट तयार करणे.

ii. विद्यार्थीनींच्या प्रशिक्षणाच्या दृष्टीकोनातून लागणाऱ्या विविध बाबींसाठी विविध कार्यालयाशी संपर्क करणे.

iii. विद्यार्थीनींच्या शैक्षणिक तासिका संबधी प्राध्यापकांशी संपर्क करणे, तसेच तासिकेचे नियोजन करणे.

iv. खरेदी करण्यात आलेले सामान तपासणी करून विवरण सादर करणे.

v. विद्यार्थीनींना प्रवेशीत केलेल्या महाविद्यालयाशी समन्वय साधणे व अडी अडचणींचे निरासन करणे.

vi. विद्यार्थीनींना आरोग्यासंबधी काही अडचणी निर्माण झाल्यास त्यांना रूग्णालयात घेऊन जाणे.

vii. संस्थेत भेटीकरिता येणाऱ्या आगंतुकांच्या शंकचे निरासण करणे.

viii. संस्थेतील प्रशासकीय काम-काजावर नियंत्रण ठेवून ते व्यवस्थीत रित्या करवून घेणे.

ix. संचालकांच्या आदेशानूसार प्रशिक्षणाशी व प्रशासकीय निगडीत कामे करणे.

ब. **इतर अटी व शर्ति**

i. विवक्षित कामासाठी करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यास विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी व नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही याबाबत बंधपत्र/हमीपत्र द्यावे लागेल.

ii. सदर कामासाठी करार पद्धतीने देण्यात येणारी नियुक्ती ही एका वेळी जास्तीत जास्त एक वर्षासाठी राहील.

पान नं. २ वर

Scanned with OKEN Scanner

iii. करार पद्धतीने नियुक्ती करण्यात आलेली व्यक्ती वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंत कार्यरत राहू शकेल.

iv. करार पद्धतीने नियुक्त करण्यात येणारा सेवानिवृत्त अधिकारी शारिरीक,मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

v. करार पद्धतीने नियुक्त होण्याकरिता सेवानिवृत्त अधिकारी यांच्या विरूद्ध कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

vi. करार पद्धतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या व्यक्तीची नियुक्ती ही नियमित स्वरूपाच्या कामकाजासाठी नसून केवळ विवक्षित कामासाठी करण्यात येईल.

vii. करार पद्धतीने नियुक्ती देण्यात येणाऱ्या सबंधित अधिकाऱ्यास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

viii. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पद्धतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

ix. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही व्यवसायीक कामात गुंतलेली नसावी.

x. करार पद्धतीने नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबध (Conflict of interest) जाहिर करणे आवश्यक राहील.

xi. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना त्यांना प्राप्त होणारी कागदपत्रे/माहिती आधारसामुग्री बाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

xii. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील.

xiii. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस कोणत्याही प्रकारचे प्रशासकिय व वित्तीय अधिकार राहणार नाहीत.

क. <u>मासिक पारिश्रमिक व भत्ते</u> :-

जाहिराती मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या शासन निर्णयामध्ये देण्यात आलेल्या सुचनांचे पालन करून मासिक पारिश्रमिक व भत्ते यांची गणना करण्यात येईल व प्रदान करण्यात येतील.

**टिप : उमेदवाराने अर्ज करतेवेळी कर्तव्ये/जबाबदाऱ्या व अटी व शर्ति मान्य असल्याचे अर्जात नमूद करावे.**

संचालक
मुलींची सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था,नाशिक

Scanned with OKEN Scanner